Swad - Har Ghar, Har Pal

BSE Ltd.
[Bombay Stock Exchange Ltd]
Phiroze Jeejeebhoy Towers,
Dalal Street,
Mumbai – 400 001

CFPL/SEC/BSE/ 9409/2019-20 **By Online Submission**
7th September, 2020

**KIND ATTN: CORPORATE SERVICES DEPARTMENT**

**Subject: -Newspaper publication regarding the Notice of 38th Annual General Meeting of the Company to the Members.**

Dear Sir,

Pursuant to the provisions of Regulation 47 (3) of the Securities and Exchange Board of India (Listing Obligations and Disclosure Requirements) Regulations, 2015 we are enclosing the copies of the Notice published in newspapers as on 6th September, 2020 in 'Daily Eaikya' Satara and 'Times of India' (Kolhapur Edition) pertaining to the Notice of 38th Annual General Meeting of the Company which includes the information regarding E-voting and Book closure dates.

Thanking You.

Yours Faithfully,
For Chordia Food Products Limited

Tejashree Bhalerao
Company Secretary
& Compliance Officer

Encl: As above.

# बारक्या



*वर्षे झाली दहा-बारा*
*आलो जन्माला जेव्हा*
*अम्माचे बाळंतपण खोपटात*
*आलो काळोखातून अंधारात*
*माया लई माझ्यावर*
*चार पोरींवर झाल्यालो*
*वाटले उजळेल तकदीर*
*हौसेने पुकारले अकबर*
*गोशा पाळताना*
*जगली नाही फार*
*गेली झिजून तनमनी*
*होऊन शिकार टीबीची*
*पोराबाळांच्या काळजीने*
*खचला अब्बाजान*
*केली बीवी तरणी*
*मिळाली माँ सौतेली*
*झगडे दररोजचे जातायेता*
*नव्हती कमी खेकसायची*
*''अकबऱ्या क्यूँ फुकटमें पोसनेका?''*
*वाया अब्बाजान पायी दारुच्या*
*काढले घराबाहेर जेव्हा*
*घर शेवटी घरच*
*उमगले रस्त्यावर आलो तेव्हा*
*काय चीज आहे ही दुनिया!*
*लागतात पोरे कामाला*
*लाला मिस्त्रीच्या गॅरेजला*
*पाहून माझी दशा*
*आली त्याला दया*
*''क्योंबे नाम क्या है तुम्हारा?''*
*अकबर!*
*''साला अपने आपको बादशाह समजता है क्या?*
*तुम्हें बारक्या नाम से पुकारेंगे''*
*बारसे तेव्हापासून, बारक्या,*
*जसे अशक्या आणि म्हमद्या*
*इतिहासात अशोक राजा मोठा*
*पण अशक्याची ष्टोरी नव्हती*
*वेगळी माझ्यापेक्षा*
*पाना, टॉमी, इस्क्रू चावी*
*झाले मित्र सारे*
*पावमिसळ पोटाला*
*गॅरेजच विश्व माझे*
*होता पेट्रोलपंप शेजारी*
*पहायचो दररोज दुनियादारी*
*रंगीबेरंगी विश्व श्रीमंतांचे*
*बायकापोरे जणू संगमरवरी*
*अशाच एका संध्याकाळी*
*आली युवती संगमरवरी*
*पडली बंद तिची गाडी*
*जणू अप्सरा अवतरली*
*''अबे ओ अकबऱ्या, इस्क्रू चावी ला*
*तुझे जोधाबाई मिलनेवाली है क्या?''*
*आलो जमिनीवर पानासारखा गळलेल्या*
*द्यायला तोंड जीवनाला, गॅटरवाल्या*

– ॲड. धैर्यशील पाटील
०२१६२-२३१४०१



डॉ. सुभाष चव्हाण यांच्याशी चर्चा करताना राजाभाऊ काळे व यशवंत जगताप, समवेत डॉ. सी. के. यादव. (नितीन खैरमोडे)

# पाटण ग्रामीण रुग्णालयातील गैरसोयीबाबत कृतीतून पूर्तता करू : डॉ. सुभाष चव्हाण

▲ **पाटण**, दि. ५ : सातारा जिल्ह्यात कोरोनाचा वाढता प्रादुर्भाव लक्षात घेता जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. सुभाष चव्हाण यांनी पाटण ग्रामीण रुग्णालयास भेट देवून कामकाजाचा आढावा घेतला. रुग्णालयातील अडचणी समजून घेतल्या. कोरोना काळात आरोग्य यंत्रणा सतर्क असून ग्रामीण रुग्णालयावर अतिरिक्त ताण पडत आहे. या ठिकाणच्या असणाऱ्या गैरसोयी दूर करण्याबाबत केवळ बोलून न दाखवता त्याची कृतीतून पूर्तता करू, असा ठाम विश्वास जिल्हा शल्य-चिकित्सक डॉ. सुभाष चव्हाण यांनी पत्रकारांशी बोलताना व्यक्त केला.

गेल्या काही महिन्यांपासून सातारा जिल्ह्यासह पाटण तालुक्यात कोरोनाचा वाढता प्रादुर्भाव लक्षात घेता या पार्श्वभूमीवर तसेच पाटण ग्रामीण रुग्णालयात वैद्यकीय अधिकाऱ्यांसह इतर विविध पदे रिक्त आहेत, ती तातडीने भरली जावीत, यासाठी मराठा-बहुजन क्रांती मोर्चा व सामाजिक ऐक्य परिषदेच्या-वतीने रुग्णालयासमोर आंदोलन करण्यात आले होते. याबाबतचे निवेदन खा. श्रीनिवास पाटील यांनाही देण्यात आले होते. याची खा. पाटील यांनी तातडीने दखल घेत सातारा जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. सुभाष चव्हाण यांना प्रत्यक्ष पाटण ग्रामीण रुग्णालयात जावून कार्यवाही करण्याच्या सूचना दिल्या होत्या. त्या अनुषंगाने डॉ. सुभाष चव्हाण यांनी पाटण ग्रामीण रुग्णालयाला भेट दिली. यावेळी मराठा-बहुजन क्रांती मोर्चाचे समन्वयक राजाभाऊ काळे, यशवंतराव जगताप यांच्यासह पाटण ग्रामीण रुग्णालयाचे वैद्यकीय अधीक्षक डॉ. सी. के. यादव व पत्रकार उपस्थित होते.

सातारा जिल्ह्यात कोरोनाचा प्रादुर्भाव वाढत असला तरी आरोग्य यंत्रणा सतर्क आहे. पाटण तालुक्याची भौगोलिक परिस्थिती पाहता इतर तालुक्यांच्या तुलनेत वेगळी आहे. पाटण तालुक्यातील कोरोना बाधित रुग्णांच्या संख्येतही वाढ झालेली पहावयास मिळत असून ग्रामीण रुग्णालयावर त्याचा अतिरिक्त ताण पडत आहे. रुग्णसंख्या वाढत असली तरी आपली आरोग्य यंत्रणा सतर्क असल्याचे डॉ. चव्हाण यांनी सांगितले.

समन्वयक राजभाऊ काळे यांनी ग्रामीण रुग्णालयात डॉक्टरसह कर्मचाऱ्यांची संख्या मोठ्या प्रमाणावर कमी असून त्यामुळे कोरोनाकाळात रुग्णालयावर जास्त ताण पडत आहे. रुग्णालयाची १०८ ची गाडी कोविडला दिल्याने स्थानिक रुग्णांना बाहेर ठिकाणी घेवून जाताना व आणताना अडचणी येत आहेत. कर्मचाऱ्यांची व विविध विभागातील संख्या कमी असल्याने रुग्णांवर तातडीने उपचार होत नाहीत, यांसह इतर गैरसोयींबद्दल माहिती देवून त्या सोडविण्याची मागणी केली. यावर डॉ. चव्हाण यांनी गांभीर्याने दखल घेवून येथील अडचणी लवकरच सोडविल्या जातील, हे केवळ आश्वासन नाही तर मी कृतीतून करून दाखवू, असा विश्वास व्यक्त केला.

### खा. श्रीनिवास पाटील यांच्याकडून दखल

पाटण ग्रामीण रुग्णालयात डॉक्टर व कर्मचाऱ्यांच्या अपुऱ्या संख्येमुळे रुग्णांची कुचंबणा होत होती. याबाबत अनेक वेळा लोकप्रतिनिधींना निवेदनेही दिली होती. मराठा-बहुजन क्रांती मोर्चा व सामाजिक ऐक्य परिषदेच्यावतीने खा. श्रीनिवास पाटील यांना निवेदन देवून पाटण ग्रामीण रुग्णालयासमोर ३१ ऑगस्ट रोजी रुग्णालय बंद आंदोलन करण्यात आले होते. याची खा. पाटील यांनी तत्काळ दखल घेत जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. सुभाष चव्हाण यांना रुग्णालयास प्रत्यक्ष भेट देवून कार्यवाही करण्याच्या सूचना दिल्या. त्यानंतर डॉ. चव्हाण यांनी रुग्णालयास भेट देवून सर्वांना आश्वस्त केले.

# जिल्ह्यातील ८७५ संशयितांचे अहवाल कोरोनाबाधित



▲ **सातारा,** दि. ५ : जिल्ह्यात शुक्रवारी रात्री जाहीर करण्यात आलेल्या रिपोर्टनुसार ८७५ नागरिकांचे अहवाल कोरोनाबाधित आले आहेत, अशी माहिती जिल्हा शल्यचिकित्सक सुभाष चव्हाण यांनी दिली.

कोरानाबाधित अहवालामध्ये-कराड तालुक्यातील कराड ४८, मंगळवार पेठ २, सोमवार पेठ १०, शनिवार पेठ ५, रविवार पेठ ३, गुरुवार पेठ ३, शुक्रवार पेठ २, शिवाजी हौसिंग सोसायटी १, कृष्णा हॉस्पिटल १, मलकापूर ११, आगाशिवनगर ६, कोयना वसाहत १, वाकाण रोड १, कार्वे नाका ७, शिरवडे १, खोडशी १, शेरे ११, घोणशी २, ओंड १, कार्वे १, रेठरे ३, बनवडी १, वाटेगाव १, सैदापूर १, काले ३, आटके १, नंदगाव १, श्रद्धा क्लिनिक ४, सुपने १, वहागाव ३, वनवासमाची १, मसूर १, बनपुरी कॉलनी, कराड १, कोडोली १, पाल २, वाकाण रोड ४, आरेवाडी १, राजाळे १, उंब्रज ८, पाली १, कोपर्डे १, जखिणवाडी १, गोळेश्वर २, शहापूर १, रेठरे खुर्द १, पार्ले २, बहुले १, ओगलेवाडी १, कापील १, कोडोली १, किवळ २, हजारमाची ४, विरवडे ७, रेठरे बुद्रुक २, सुपने १, ओंडोशी १, ओंड १, उंडाळे २, वारुंजी फाटा १, मुंडे १, हणबरवाडी १, वाठार १, बेलवडे बुद्रुक १, चोपडी १, शेणोली २, बेलदरे १, रिसवड १, जुळेवाडी १, विद्यानगर, कराड १, सातारा तालुक्यातील सातारा १५, सोमवार पेठ ४, शुक्रवार पेठ १, गुरुवार पेठ १, मंगळवार तळे १, शनिवार पेठ ९, मंगळवार पेठ ३, रविवार पेठ १, सदरबझार १३, मल्हारपेठ ३, कर्मवीरनगर १, प्रतापसिंहनगर १, करंजे २, गोडोली ४, विलासपूर २, आरेदरे १, विकासनगर १४, पोलीस मुख्यालय २, गोवे ३, बसाप्पाचीवाडी २, नुने ४, भरतगाव २, कोडोली २, नागठाणे १, समर्थ मंदिर २, आंबवडे १, चिंचणेर वंदन २, गोवे १, खेड २, संगमनगर २, प्रतापगंज पेठ १, म्हसवे १, शाहूपुरी ६, यादोगोपाळ पेठ २, कामथी १, वर्ये २, खिंडवाडी ३, महागाव ३५, राधिका रोड १, गुलमोहर कॉलनी, सातारा १, पाटखळ १, शेंद्रे १, कोंडवे १, बोरगाव १, आरळे १, काशिळ १, रामाचा गोट १, देवी चौक, सातारा १, संभाजीनगर, सातारा १, दौलतनगर, सातारा ५, शाहुनगर, सातारा ३, वाढे १, गोळीबार मैदान, सातारा २, तामजाईनगर, सातारा ६, संभाजीनगर, सातारा १, आरळे १, क्षेत्रमाहुली १, अंगापूर वंदन १, देगाव रोड, सातारा १, शिवथर १, गुलमोहर कॉलनी, सातारा १, चिमणपुरा पेठ, सातारा १, व्यंकटपुरा पेठ, सातारा १, देगाव १, विसावा, नाका, सातारा १, शेलारवाडी १, खंडाळा तालुक्यातील सांगवी २, शिवाजी चौक, शिरवळ २, सुखेड २, खेड ३, लोणंद २, पारगाव १, वडगाव २, शिरवळ ६, अंदोरी १, पळशी १, पाटण तालुक्यातील पाटण ७, नवारस्ता १, आडूळगाव १, नवसारी १, येरवडी १, साबळेवाडी ४, गुढे ४, धुमाळवाडी ३, ढेबेवाडी ३, शिबेवाडी १, माण तालुक्यातील माण १, तोंडले १, दहिवडी ८, स्वरूपखानवाडी १, म्हसवड २२, तोंडले १,भांडवली २, भाटकी १, गोंदवले खुर्द १, मोगराळे १, खटाव तालुक्यातील खटाव ५, कातरखटाव ६, वडूज ६, पाचवड ४, राजापूर ४, चितळी १, मायणी १, औंध ५, जाखणगाव २, वेटणे २, खातगुण २, वडगाव १, कोरेगाव तालुक्यातील कोरेगाव १०, आझाद चौक १, आर्वी १, भक्तवडी २, कुमठे फाटा ४, कुमठे २, तळीये २, चिंचळी १, तारगाव ३, आझादपूर १, तडवळे १, शेंदुरजणे १, सातारारोड कोरेगाव ४, पिंपोडे बुद्रुक ३, वाघोली १, देवूर २, वाघोली २, सर्कलवाडी १, वाठार स्टेशन २, रहिमतपूर ४, धामणेर १, फलटण तालुक्यातील फलटण ६, लक्ष्मीनगर ५, मंगळवार पेठ ४, शुक्रवार पेठ २, सोमवार पेठ २, विद्यानगर १, रविवार पेठ १, मालेवाडी १, मलटण ७, बरड १, खराडेवाडी ५, पवारवाडी ९, कोळकी ३, काळज २, पिंपळवाडी १, भाडळी बुद्रुक १, धुमाळवाडी, गिरवी १, सगुणामाता नगर ३, साखरवाडी २, विद्यानगर १, कसबा पेठ १, मोरगिरी १, कांबळेश्वर ४, जिंती ४, इंद्रानगर १, भैरोबा गल्ली १, सरडे १, खुंटे २, निंबळक १, विडणी १, निंबळक १, पोलीस कॉलनी फलटण २, अलगुडेवाडी १, वेटणे १, बिरावडे नगर, फलटण १, मोनगिरी १, सस्तेवाडी २, जावली तालुक्यातील जावली १, उंबरीवाडी २, मेढा ४८, रिटकवली १, जवळवाडी १, खरशी ४, रायघर १, खरशी १, वाई तालुक्यातील वाई ५, सोनगिरवाडी ४,भगवा कटा १०, उडतारे १, जांब ३, अमृतवाडी ३, देगाव १, बोपेगाव ७, कवटे ४, पसरणी ४, सुरुर १, कोहिनूर रेसिडेन्सी, वाई ३, वरखडवाडी १, पाचपुतेवाडी १, बोपर्डी १, बावधन नाका १, बोरगाव १, सिद्धनाथवाडी ४, पिराचीवाडी १, मेणवली ३, धावडी १, यशवंतनगर ५, कुसगाव १, एकसर १, गंगापुरी १, नावेचीवाडी १, एमआयडीसी १, मधली आळी, वाई २, धरमपुरी २, सह्याद्रीनगर २, रामडोह आळी १, किकली १, भुईंज १, ब्राह्मणशाही १, गणपती आळी वाई ३, धावडवाडी १, वेरुळी १, व्याजवाडी १, सह्याद्रीनगर १, महाबळेश्वर तालुक्यातील माने गल्ली, पाचगणी ८, गोडोली ८, पाचगणी ८, ताकवली २, तापोळा २, इतर २८, बाहेरील जिल्ह्यातील इस्लामपूर, जि. सांगली १, येडेमच्छींद्र, जि. सांगली १, वाटेगाव, ता. वाळवा २, रेठरे, ता. वाळवा १, विटा, जि. सांगली १, नवी मुंबई १, पुणे १, बेलापूर, मुंबई १.

# पाटण तालुक्यात आणखी ५१ व्यक्तींना कोरोनाची लागण

▲ **पाटण**, दि. ५ : पाटण तालुक्यात शुक्रवारी रात्रीच्या आलेल्या कोरोना अहवालात नव्याने आणखी ५१ व्यक्तींना कोरोनाची लागण झाली आहे. दरम्यान आणखी दोघांचा उपचारा दरम्यान मृत्यू झाला आहे तर शनिवारी तिघांनी कोरोनावर मात केली. आत्तापर्यंत तालुक्यात एकूण ८२० व्यक्तींना कोरोनाची लागण झाली. त्यापैकी तब्बल ५३७ व्यक्तींनी कोरोनावर मात केली आहे. यात आत्तापर्यंत ४५ व्यक्तींचा मृत्यू झाला असून सध्या २३८ बाधितांवर विविध ठिकाणी उपचार सुरू असल्याची माहिती उपविभागीय अधिकारी श्रीरंग तांबे व तालुका आरोग्य अधिकारी डॉ. आर. बी. पाटील यांनी दिली.

शुक्रवारी रात्री आलेल्या अहवालात मोरेवाडी ३८ वर्षीय पुरुष, साबळेवाडी ५०, ४८, २४ वर्षीय पुरुष, कार्वे नाका स्थानिक कर्मचारी ३० वर्षीय पुरुष, आगाशिवनगर ७४ वर्षीय महिला, गुढे ७५, ६० वर्षीय पुरुष, १७, ४० वर्षीय महिला, १२ वर्षीय बालक, धुमाळवाडी ३० वर्षीय पुरुष, २८, ३२ वर्षीय महिला, ढेबेवाडी ३६, ४८, १५ वर्षीय पुरुष, पाटण ४५ वर्षीय महिला, २०, १६, ३७ वर्षीय पुरुष, आवर्डे २८, २७, ४२ वर्षीय पुरूष, घोगाव (वाई) ५४ वर्षीय पुरूष, तारळे ३८ वर्षीय पुरुष, चाफळ ३८ वर्षीय पुरुष, ३१ वर्षीय महिला, ६, ११ वर्षीय बालिका, मल्हारपेठ ५६ ६९, ३० २७ वर्षीय पुरुष, २५, ५५ वर्षीय महिला, नाडोली ४० वर्षीय महिला, ७० वर्षीय पुरुष, चोपडी ३५ वर्षीय पुरुष, मोरगिरी ४७, ३० वर्षीय पुरुष , १८, ४२ वर्षीय महिला, मरळी ५८, ५०, ४५ वर्षीय पुरूष, केरळ ३५ वर्षीय पुरुष, गारवडे ३२ वर्षीय पुरुष, सोनवडे ३५वर्षीय पुरुष अशा एकूण ५१ व्यक्तींचा कोरोना अहवाल पॉझिटिव्ह आल्याने त्यांच्यावर तातडीने पुढील उपचार सुरू करण्यात आले आहेत.

दरम्यान उपचारा दरम्यान आणखी दोघांचा मृत्यू झाल्याने त्यांच्यावर स्थानिक नगर-पालिकेकडून कोविड निकषांनुसार अंत्यसंस्कार करण्यात आले. शनिवारी नव्याने आणखी तिघांनी कोरोनावर मात केल्याने त्यांना घरी सोडून आगामी सात दिवसांसाठी होम क्वॉरन्टाइन करण्यात आले आहे. सध्या २३८ बाधितांवर कृष्णा, सह्याद्री हॉस्पिटल, कराड, सिव्हिल हॉस्पिटल सातारा व कोरोना केअर सेंटर, पाटण याशिवाय काहींवर होम क्वॉरन्टाइन करून तेथे पुढील उपचार सुरू आहेत. याशिवाय या बाधितांच्या संपर्कातील कुटुंबीय व नातेवाईक आदी हाय रिस्कमधील व्यक्तींना पाटण येथील प्रियदर्शनी महिला वसतिगृह, मिल्ट्री बॉइज होस्टेल, डॉ. बाबासाहेब आंबेडकर जुने वसतिगृह व तळमावले येथील कोरोना केअर सेंटर व काहींना होम क्वॉरन्टाईन करून तेथे विलगीकरण कक्षात ठेवण्यात आले आहे.

# महाराष्ट्र रंग कामगार सेनेतर्फे सॅनिटायझर भेट

▲ **म्हसवड,** दि. ५ : वडूज पोलीस ठाण्यातील कर्मचारी कोविड १९ च्या साथीपासून सुरक्षित राहण्यासाठी महाराष्ट्र रंग कामगार सेनेचे अध्यक्ष विश्वासराव साळुंखे, कार्याध्यक्ष धनाजी सावंत, चिटणीस महेश फरतडे यांच्यावतीने शंभर लिटर हँड सॅनिटायझर सहाय्यक पोलीस निरीक्षक मालोजीराजे देशमुख यांच्याकडे सुपूर्द करण्यात आले. कोविड १९ च्या साथीच्या काळात पोलीस कर्मचारी यांच्यासाठी हँड सॅनिटायझर भेट देऊन मदत केल्याबद्दल मालोजीराव देशमुख यांनी आभार मानले.



पोलीस ठाण्यास हँड सॅनिटायझर भेट देताना विश्वासराव साळुंखे, धनाजी सावंत, महेश फरतडे, मालोजीराव देशमुख आदी.

# कोविड रुग्णांच्या मदतीसाठी दानशूर व्यक्तींनी सढळ हाताने मदत करावी : काटकर



▲ **फलटण,** दि. ५ : कोरोना विषाणूचा वाढता प्रादुर्भाव आणि वाढती रुग्ण संख्या याचा विचार करता फलटण येथे किमान ५०० ऑक्सिजनयुक्त बेड उपलब्ध करून देण्याचा प्रयत्न असून त्यासाठी शहर व तालुक्यातील स्वयंसेवी, सहकारी, व्यापारी संस्था, छोटे व मोठे व्यावसायिक, बांधकाम व्यावसायिक, उद्योजक, व्यापारी, दानशूर व्यक्तींनी पुढाकार घ्यावा, असे आवाहन नगरपरिषद मुख्याधिकारी प्रसाद काटकर यांनी केले आहे.

शहर व तालुक्यात या आजाराचा फैलाव खूप झपाट्याने होत असून दिवसेंदिवस रुग्णांची संख्या मोठ्या प्रमाणामध्ये वाढत आहे. मात्र त्या प्रमाणामध्ये रुग्णांना बेड उपलब्ध होत नाहीत व काही रुग्णांना जर ऑक्सिजन देण्याची गरज भासली तर तेवढे ऑक्सिजनचे बेड आपल्या फलटणमध्ये उपलब्ध नाहीत. ऑक्सिजनचा बेड उपलब्ध न झाल्यामुळे रुग्णांचा जीव धोक्यात येत आहे. भविष्यात रुग्णांची संख्या वाढण्याची शक्यता गृहीत धरून फलटण शहरामध्ये ५०० ऑक्सिजनयुक्त बेड उपलब्ध करण्याचा प्रयत्न सुरू असल्याचे फलटण नगरपरिषद मुख्याधिकारी प्रसाद काटकर यांनी स्पष्ट करून सढळ हस्ते मदतीचे आवाहन केले आहे. आपल्या या मदतीमुळे अनेक कोरोनाग्रस्त रुग्णांचे प्राण वाचणार असून या ऑक्सिजनमुळे त्यांना जीवनदान मिळणार आहे. आपली मदत कामाला येणार असल्याचे प्रसाद काटकर यांनी स्पष्ट केले आहे.

# सम्मेद शिखरजी यात्रेचे आयोजन

▲ **फलटण,** दि. ५ : प्रतिवर्षाप्रमाणे सकल जैन समाजाच्यावतीने दि. ३ ते १५ फेब्रुवारी दरम्यान श्री क्षेत्र सम्मेद शिखरजी यात्रेचे आयोजन करण्यात येत असून इच्छुकांनी नाव नोंदणी करावी, असे आवाहन संयोजक व नगरसेवक अनुप शहा यांनी केले आहे.

या यात्रेत अपंग व्यक्ती व त्यासोबत एक केअर टेकर अशा दोन व्यक्तींना मोफत यात्रा करविण्यात येणार असून उर्वरित सहभागी इच्छुकांनी प्रत्येकी ६ हजार १११ रुपये भरून आपली जागा निश्चित करावी, असे आवाहन करण्यात आले आहे.

या यात्रेत कुंडलपूर, पावापुरी, राजगृही, गुणावाजी, लछवाड, सम्मेद शिखरजी, बनारस (काशी), अयोध्या आदी तीर्थक्षेत्रांचे दर्शन होणार आहे.

अधिक माहितीसाठी अनुप शहा यांच्याशी मोबा. ९६८९९४१००८, स्वप्निल दोशी यांच्याशी मोबा. ९०९६७०१००८, सुमित दोशी यांच्याशी मोबा.८८८८३२१००८ वर संपर्क साधावा.

# सुभाष दळवी यांना आदर्श शिक्षक पुरस्कार जाहीर



▲ **सातारा,** दि. ५ : वागदरे, ता. जावली येथील जिल्हा परिषद शाळेतील शिक्षक सुभाष काशिनाथ दळवी यांना सातारा जिल्हा परिषदेचा आदर्श शिक्षक पुरस्कार जाहीर झाल्यामुळे जावली तालुक्याच्या शिरपेचात अजून एक मानाचा तुरा खोवला गेला आहे.

शिक्षण क्षेत्रात नावीन्यपूर्ण उपक्रम राबविणाऱ्या कर्तृत्ववान शिक्षकांना दरवर्षी सातारा जिल्हा परिषदेच्यावतीने आदर्श शिक्षक पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात येते. या वर्षीच्या सन्मान सोहळ्यात जावली तालुक्यातील जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, वागदरे या शाळेतील पदवीधर शिक्षक सुभाष काशिनाथ दळवी यांना आदर्श शिक्षक पुरस्कार देऊन गौरवण्यात येणार आहे. सुभाष दळवी जावली तालुक्यातील म्हाते खुर्द गावचे. याच गावात त्यांचे प्राथमिक व माध्यमिक शिक्षण पूर्ण झाले. यानंतर कुसूर येथे डी. एड. चे शिक्षण पूर्ण करून त्यांनी १० डिसेंबर १९९० मध्ये शिक्षक म्हणून सेवेचा श्रीगणेशा केला. जावली तालुक्यातील डांगरेघर या छोट्याशा, दुर्गम गावी त्यांनी आपला सेवारंभ सुरू केला. शाळा पहिली ते चौथीपर्यंतची. पुढील शिक्षण घेण्यासाठी विद्यार्थ्यांना नैसर्गिक अडचणींना सामोरे जावे लागत होते. अशावेळी शाळेचे वर्ग सातवीपर्यंत वाढवायचे हा विचार दळवी यांनी गावापुढे ठेवला; परंतु जागेचा प्रश्न उभा राहिला. दळवी यांनी गावची मसनवाट्याची जवळपास ४ एकर जमीन शाळेसाठी मिळवली. ग्रामस्थ व शासनाच्या सहकार्यातून त्या ठिकाणी एक सुंदर शाळा उभी केली. या शाळेत २० वर्षे त्यांनी ज्ञानदानाचे पवित्र कार्य प्रामाणिकपणे केले. शिष्यवृत्ती परीक्षा, वक्तृत्व, निबंध, बालनाट्य, हस्ताक्षर, प्रश्नमंजूषा विज्ञान प्रदर्शन व गीतमंच अशा विविध स्पर्धेत त्यांनी डांगरेघर शाळेला यशोशिखरावर पोहोचवले.

डांगरेघर गावच्या शैक्षणिक प्रगतीबरोबरच आदर्श माता, आदर्श कुटुंब, व्यसनमुक्त पुरस्कार, श्रमदान व समाजप्रबोधन असे उपक्रम राबवून त्यांनी सामाजिक व सांस्कृतिक कार्यातही आपला ठसा उमटवला. महाबळेश्वर तालुक्यातील वारसोळी कोळी या अत्यंत दुर्गम शाळेवर त्यांनी २ वर्षे उत्कृष्ट कामकाज केले. त्यानंतर वागदरे या शाळेत पदवीधर शिक्षक म्हणून पदोन्नतीने ते हजर झाले. पदवीधर शिक्षक व प्रभारी मुख्याध्यापक या दोन्ही भूमिका आज ते या शाळेवर लीलया पार पाडत आहेत. शिष्यवृत्ती परीक्षेत या शाळेने त्यांच्या मार्गदर्शनाखाली भरीव कामगिरी केली असून २०१७ साली त्यांच्या नेतृत्वाखाली वागदरे शाळेने सुवर्णमहोत्सव साजरा केला. त्यांच्या कुशल मार्गदर्शनाखाली विविध स्पर्धा व उपक्रम यामध्ये वागदरे शाळेने गरूडझेप घेतली आहे. त्यांनी वागदरे शाळेत आयोजित केलेला बाल आनंद मेळावा कौतुकाचा विषय ठरला होता. कोरोना महामारीमुळे सुरू असलेल्या लॉकडाउनच्या काळात प्रत्यक्ष भेटीद्वारे व उत्तम तंत्रज्ञानाच्या माध्यमातून ते विद्यार्थ्यांपर्यंत शिक्षण पोहोचवत आहेत. कोरोना योद्धा म्हणून शासनाच्या विविध उपक्रमात उत्साहाने सहभागी होत आहेत. त्यांच्या ३० वर्षांच्या शैक्षणिक प्रवासातील डांगेघर, वारसोळी कोळी व वागदरे या तीनही प्राथमिक शाळा अत्यंत दुर्गम आहेत. त्यांनी आपल्या अंगी असलेल्या विविध गुणांनी या शाळांना वेगळ्या उंचीवर नेऊन ठेवले आहे. स्वच्छ, सुंदर व उपक्रमशील शाळा, प्रगत शाळा, डिजिटल शाळा, आयएसओ मानांकनप्राप्त शाळा, 'अ' श्रेणीतील समृद्ध शाळा असे गुणवत्तेचे विविध शैक्षणिक टप्पे त्यांनी आपल्या शाळांना प्राप्त करून दिले आहेत. महाराष्ट्राचे तत्कालीन राज्यपाल पी. सी. ॲलेक्झांडर यांच्या हस्ते सुभाष दळवी यांना सन्मानित करण्यात आले असून जावली पंचायत समितीने आदर्श शिक्षक तालुका पुरस्कार देऊन गौरविले आहे. अनेक संस्थांनी त्यांच्या कामाची दखल घेऊन त्यांचे कौतुक केले आहे.


**WANTED**

Authorized Dealer of Force Motors Ltd., required following Personnel at their Showroom.

1) **Sales Manager** :- Dynamic, Graduate/MBA having quality of team Building, day to day activity planning & execution, Target oriented ability to achieve market leadership. Minimum 2 to 4 Years Experience in Sales field. **01 Post**

2) **Sales Executive**:- Graduate with 2 to 3 Years Experience in Sales Own Two Wheeler is Must. **4 Posts**

Send Your Application with BIO-DATA & Latest Photograph

To :- **Mutha Automobiles Pvt Ltd.,**
**41, Mutha Colony, Sadar Bazar, Satara-415001**
**(Phone - 234728, 236729, 229491, 234727**
email-muthaauto2@gmail.com



**हार्दिक अभिनंदन**



मा. सुभाष दळवी

वागदरे, ता. जावली जिल्हा परिषद शाळेतील शिक्षक **मा. सुभाष दळवी यांना** सातारा जिल्हा परिषदेचा सन २०१९-२० चा **जिल्हा आदर्श शिक्षक पुरस्कार मिळाल्याबद्दल** त्यांचे **हार्दिक अभिनंदन** व पुढील वाटचालीस **शुभेच्छा !**



मा. प्रकाश मालुसरे

- शुभेच्छुक -
**मा. प्रकाश तुकाराम मालुसरे आणि परिवार, संभाजीनगर, कोरेगाव, जि. सातारा.**


**चोरडिया फुड प्रॉडक्टस् लिमिटेड**
नोंदणीकृत कार्यालय: प्लॉट नं. ३९९/४००, सर्व्हे. नं. ३९८, गाव सांगवी-शिरवळ, ता. खंडाळा, जिल्हा-सातारा - ४१२ ८०१.
ईमेल: cs.cfpl@gmail.com वेब साईट: www.chordiafoods.com
CIN: L15995PN1982PLC026173, संपर्क क्रं: ९१३००७६८५६

**सूचना**

याद्वारे सूचित करण्यात येते की, कंपनीची ३८वी वार्षिक सर्वसाधारण सभा शनिवार दि. २६ सप्टेंबर, २०२० रोजी सकाळी ११.३०वाजता व्हिडिओ कॉन्फरन्सिंग किंवा इतर दृकश्राव्य माध्यमाद्वारे ('ओव्हीएम')च्या माध्यमातून घेण्यात येईल ज्यात सभेच्या १३ ऑगस्ट २०२०रोजीच्या सूचनेनुसार कामकाज होईल आणि कंपनीच्या एजीमबाबतची ही सूचना समभागधारकांना पाठवण्यात येईल.

कोव्हिड - १९ महामारीची स्थिती पाहता, कॉर्पोरेट बाबी मंत्रालय (एमसीए)ने त्यांच्या परिपत्रक क्र. १८/२०२०, १७/२०२० आणि २०/२०२० (यापुढे एकत्रितपणे 'एमसीए परिपत्रके' असा उल्लेख करण्यात येईल.) आणि सेबी एलओडीआर रेग्युलेशन्स २०१५चे पालन करीत परिपत्रक क्र. DEBI/HO/CFD/CHD 1/CIR/P/2020/79 (सेबी परिपत्रक)च्या अन्वये कंपन्यांना २०२० या वर्षादरम्यान व्हीसी/ओव्हीएमच्या माध्यमातून एजीएम घेण्यास परवानगी दिलेली आहे. समभागधारकांना व्हीसीच्या माध्यमातून एजीएम घेण्यास परवानगी दिलेली आहे. समभागधारकांना व्हीसीच्या माध्यमातून कंपनीच्या एजीएममध्ये उपस्थित राहता येईल आणि त्यांची व्हिसी सुविधेच्या माध्यमातून उपस्थिती सदर अधिनियमातील अनुच्छेद १०३ अंतर्गत कोरमसाठी ग्राह्य धरण्यात येईल.

वरील तरतुदी आणि परिपत्रकांचे पालन करीत एजीएमची सूचना आणि २०१९-२०ह्या आर्थिक वर्षाचा वार्षिक अहवाल कंपनीच्या ज्या समभागधारकांचे ई-मेल ॲड्रेस कंपनी / डिपॉझिटरी पार्टिसिपंटकडे / निबंधक आणि समभाग हस्तांतरण एजंट (आरटीए) यांचेकडे नोंदवलेले आहेत त्या सर्व समभागधारकांना पाठविण्यात येईल.

सूचना आणि वार्षिक अहवाल कंपनीच्या वेबसाइटवर www.chordiafoods.com आणि स्टॉक एक्स्चेंजची वेबसाइट www.bseindia.com येथेसुद्धा उपलब्ध आहे.

**ई-मेल ॲड्रेस नोंदविण्याची / अद्ययावत करण्याची पद्धत:**

ज्या समभागधारकांकडे अमूर्त स्वरूपातील समभाग आहेत आणि ज्यांनी आपल्या डिपॉझिटरी पार्टिसिपंटकडे आपले ई-मेल ॲड्रेस नोंदविलेले / अद्ययावत केलेले नाहीत त्यांना विनंती आहे की त्यांनी संबंधित डिपॉझिटरी पार्टिसिपंटकडे आपले ई-मेल ॲड्रेस नोंदवावेत/अद्ययावत करावेत, आणि ज्या समभागधारकांकडे मूर्त स्वरूपातील समभाग आहेत त्यांनी कंपनीच्या रजिस्ट्रार आणि शेअर ट्रान्सफर एजंट, सॅटलाईट कॉर्पोरेट सर्व्हिसेस प्रा. लि., ऑफिस नं.१०६ आणि १०७, दत्तानी प्लाझा, ईस्ट वेस्ट कम्पाऊंड, अंधेरी कुर्ला रोड, सफेदपुल, साकीनाका, मुंबई - ४०००७२ इथे किंवा मेलवर service@satellitecorporate.com संपर्क करावा.

कंपनीने सीडीएसएल मार्फत 'रिमोट ई वोटिंग' तसेच 'एजीएम दरम्यान ई-वोटिंगची सुविधा उपलब्ध करून दिली आहे. 'रिमोट ई वोटिंग'ची सुविधा बुधवार दि. २३ सप्टेंबर, २०२० सकाळी ९.०० वा. पासून ते शुक्रवार दि.२५ सप्टेंबर, २०२० संध्याकाळी ५.०० वा. पर्यंत उपलब्ध राहील. अंतिम तारखेच्या दिवशी म्हणजेच (कट ऑफ डेट) शनिवार दि.१९ सप्टेंबर, २०२० रोजी ज्या सभासदांकडे कंपनीचे समभाग असतील ते ई-वोटिंग करू शकतील. सर्वसाधारण सभेची सूचना पाठविल्यानंतर एखादी व्यक्ती कंपनीची सभासद बनल्यास त्यांनी १३ ऑगस्ट २०२० रोजीच्या सभेच्या सूचनेत नमूद केल्याप्रमाणे ई-वोटिंगच्या सूचनांचे पालन करावे.

ज्या सभासदांनी 'रिमोट ई-वोटिंगद्वारे' मतदानाचा हक्क बजावला असेल त्यांना सर्वसाधारण सभेला 'व्हिसी/ओएव्हिएम'द्वारे उपस्थित राहता येईल. परंतु मतदान करता येणार नाही.

कंपनी कायदा २०१३च्या कलम ९१च्या अन्वये असेही सूचित करण्यात येते की, कंपनीच्या सभासद नोंदणी आणि भाग हस्तांतरण वह्या बुधवार दि.२३ सप्टेंबर, २०२० ते शनिवार दि. २६ सप्टेंबर, २०२० (दोन्ही दिवस धरून) वार्षिक सर्वसाधारण सभेसाठी बंद ठेवण्यात येतील.

वरीलबाबत काही शंका/तक्रार असल्यास सदस्य कंपनी सचिव यांना cs.cfpl@gmail.com यांवर अथवा फोन नं.९१३००७६८५६ यांवर संपर्क साधू शकतात.

**चोरडिया फुड प्रॉडक्टस् लिमिटेड करिता**
सही/-
**प्रदीप चोरडिया**
व्यवस्थापकीय संचालक

ठिकाण: पुणे
दिनांक: ०३ सप्टेंबर, २०२०.

